(3)

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 183 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

# महाराष्ट्रातील शेती :समस्या

मार्गदर्शक- डॉ. ए. आय खान,
भूगोल विभागप्रमुख,शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद
संशोधक- आरगडे अंबादास रोहिदास,
भूगोल विभाग,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद
किवर्ड: शेती ,समस्या ,उपाय

## १.१ प्रास्ताविक :

भारत हा कृषीप्रधान किंवा शेतीप्रधान देश म्हणून जगभरात ओळखला जातो.भारताची संपूर्ण समृध्दी ही शेतीशी अथवा कृषीशी निगडीत होती,जी आजही आहे.मानवाने भौतिक प्रगती कितीही केली तरी त्याला दैनंदिन जीवन जगण्यासाठी जे अन्न खावे लागते त्याला पर्याय नाही.हे अन्न शेतीमधूनच निर्माण होते.त्यामुळे असे म्हटले जाते की,शेतीला पूर्वी जे महत्व होते ते आजही आहे.उद्याही रहाणार आहे.थोडक्यात मानव जात जोपर्यंत या भूतलावर आहे तोपर्यंत या भूतलावर शेती राहणार आहे.पूर्वी एक महण प्रचलित होती,उत्तम शेती,मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी, अर्थातच तेव्हा शेतकरी हाच सर्वात मोठा मानाचा धनी होता.तो वर्तमानात आहे काय? महाराष्ट्रातील सद्याच्या शेतीचे काय वास्तव आहे.कारण महाराष्ट्राची शेती देशभरातील मोठमोठ्या उद्योग धद्यांना कच्चा माल पुरविते.त्यामुळे ही शेती एक महत्वाच्या स्त्रोत वाटतो.साखर,वनस्पती तेल, कापक आणि ज्यूट इत्यादी उद्योग हे खऱ्या अर्थाने शेतीवरच अवलंबून आजही आहेत हे विसरून चालणार नाही.किबहुना भारतातील लहान-लहान कुटीरद्योग उदा:तेलबिया, हातमाग आणि भातगिरण्या इत्यादी कच्च्या मालाकरिता शेतीवरच प्रामुख्याने अवलंबून असतात.एकदंरितच विचार केल्यास असे निदर्शनास येते की, एकूणच लोकजीवनामध्ये शेतीला अनन्य साधारण महत्व अनाधी काळापासून देण्यात आलेले असून मोहन-जो-दडो व हडप्पा या ठिकाणी झालेल्या उत्खननात धान्याची कोठारे सापडल्याचे अनेक दाखले आहेत.सुमारें ५ हजार वर्षापूर्वीच्या भारतीय संस्कृतीमध्ये शेती आणि शेती व्यवसायाला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.हे त्यावरून सिध्द होते.व्यक्तीच्या जीवनात ज्या सुधारणा झालेल्या आहेत त्यातूनच आजचा समाज निर्माण झालेला आहे.हे नाकारता येत नाही.त्यामुळे सामाजिक जडघडणीमध्ये कालच्या शेतीचा,आजच्या शेतीचा आणि उद्याच्या शेतीचा अत्यंत महत्वाचा वाटा आहे,हे नाकारता येणार नाही.मात्र सद्य:स्थितीचा विचार केला तर असे दिसून येते की, महाराष्ट्रातील शेती आणि शेतकऱ्याची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. ही बिकट अवस्था अर्थात गेल्या दोन-तीन वर्षापासून झालेली नाही, तर त्याच्या आधी चार-पाच वर्षापासूनची असल्याचे दिसून येते.त्यामुळे आजच्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यापुढे शेती तिच्या अनेक समस्या निर्माण होऊ पाहत आहे.त्या वेळीच सोडवल्या गेल्या नाही, तर भविष्यात अनाकालीन परिस्थिती निर्माण होईल अशी भीती वाटते.

## १.२ संशोधनाची उदिष्टे:

"महाराष्ट्रातील शेती: समस्या" या शोधानिबंधाची उदिष्टे पढीलप्रमाणे :

१) महाराष्ट्रातील शेतीचा आढावा घेणे.
२) महाराष्ट्रातील शेतीच्या समस्या तपासणे.
३) महाराष्ट्रातील पीक उत्पादनाची स्थिती तपासणे.
४) महाराष्ट्रातील पर्जन्याचा आढावा घेणे.
५) महाराष्ट्रातील शेती समस्येवर उपाय सूचविणे.

Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science A'bad.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 183 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

### १.३ संशोधन पध्दती :

"महाराष्ट्रातील शेती: समस्या" या शोधनविषयासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा आधार घेण्यात आला आहे.

### १.४ तथ्य संकलन:

"महाराष्ट्रातील शेती: समस्या" या प्रस्तुत शोधानिबंधाच्या शास्त्रोक्त मांडणीसाठी तथ्य संकलनाच्या दोन स्त्रोतांपैकी द्वितीय स्त्रोताचा आधार घेण्यात आला आहे.त्यात महाराष्ट्राचा अर्थिक पाहणी अहवाल विविध मासिके, जर्नल्स, सोदर्भग्रंथ इत्यादीचा समावेश आहे.

### १.५ शोधनिबंधाची अवश्यकता:

भारतात आजही शेती हे सुमारे ६०% लोकांचे उदारनिर्वाहाचे साधन आहे[१] तर महाराष्ट्रातील ५५% लोक कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे.ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या उपजिविकेचे ,उदारनिर्वाहाचे साधन शेतीच आहे. मात्र महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील कृषी घटकांचा वाटा दिवसेंदिवस कमी होऊन सेवा आणि उदयोग घटकांचा वाटा सातत्याने वाढतांना दिसतो.म्हणजे महाराष्ट्रातील स्थूल उत्पन्नात सेवा आणि उदयोग घटकांचा वाटा जवळ-जवळ ८९% आहे.तर कृषी घटकांचा वाटा केवळ ११% आहे.[२] म्हणजे याबाबत एक गोष्ट निदर्शनास येते की, शेती व्यवसाय आणि शेतकऱ्याची स्थिती काय आहे.त्यातच आजच्या शेतीपुढें अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यात शेतीचे तुकडीकरण, आधुनिक शतीच्या ज्ञानाचा अभाव ,पीक व्यवस्थपनाचा अभाव, वेळेवर योग्य साधन साहित्य उपलब्ध न होणे, पर्यायी भांडवल आणि निधी पुरवठयाचा अभाव, शेतीच्या औजाराची आणि बी-बियांणांची वाढती किंमत, जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी आणि शेतमालाला असलेला अल्प भाव इत्यादींमुळे आज महाराष्ट्रातील शेती तोटयात जात आहे.

### १.६ महाराष्ट्रातील शेती :

महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी व भारताच्या स्वांतत्र्यापूर्वीचा ५०-६० वर्षाचा कालखंड तपासला तर असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रातील शेती सुधारणेच्या संदर्भात इंग्रजी राजवटीत फारसे प्रधान्य दिल्याचे दिसत नाही. तत्कालीन काळात जेंव्हा दुष्काळ पडला, तेव्हा या तीव्र दुष्काळाची नोंद घेऊन १८८१ मध्ये फेमीन कमीशनने शिफारस केल्यानुसार जुलै १८८३ मध्ये कृषि खात्याची स्थापना करण्यात आली होती.[३] शेती क्षेत्राशी निगडी सर्व विभागांचा त्यात समावेश करुन ग्रामीण भागात शेतीमध्ये उत्पादन वाढीसाठी शासन स्तरावरुन आवश्यक ती मदत करण्याच्या उद्देशाने कामाला प्रारंभ झाला.स्वातंत्र्यपूर्व काळात प्रामुख्याने शेणाच्या स्वरूपात शेणखताचा वापर केला जाई.कीटक नाशके तेव्हा म्हणावी तशी उपलब्ध झालेली नव्हती, मात्र सदय स्थितीमध्ये नगण्य वापरापासून किटकानाशकांचा वापर सुमारे ५,००० टन प्रतिवर्ष होत आहे.किवंहुना यांत्रिकिकरणाचा वापर तात्कालीन काळात अतल्प होत असून प्रामुख्याने पारंपरिक पिके भुईमुग ज्वारी बाजरी, उडीद, भात, तूर, कापूस, मूग, अशाच पिकांकरिता जमिनीचा वापर होत असे, तूर उस आणि फळे, भाजीपाला यासाठी अत्यल्प प्रमाणात जमिनीचा वापर होत असे.

स्वांतत्र्योत्तर काळात व विशेषत: महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर हरित क्रांतीचा पार्श्वभूमीवर देशाच्या उत्तर भागात म्हणजे महाराष्ट्रातही संकरित आणि अधिक उत्पन्न देणाऱ्या बियाणाचा वापर मोठ्या प्रमाणात झाला. एकाच प्रकारच्या बियाणाच्या जातीच्या वापरामुळे किटकनाशकांचा वापर ही मोठ्या प्रमाणात झाला.थोडक्यात शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज घेतल्याशिवाय शेती करणे शक्य नव्हते.त्यामुळे आजची शेती पिकणे अधिक खर्चाचे, अधिक उत्पादनाचे परंतु कमी उत्पन्नाची होती.कालांतराने त्यात बदल होऊ लागले.कृषी क्रांतीचे जनक डॉ.एम.एस. स्वामीनाथन यांनी आजच्या शेतीला हरित क्रांती असे नाव दिले, तसेच भविष्यकाळातील शेती सदाहरितक्रांतीची राहिल अशी भूमिकाही

Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's Science A'bad.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-7143
April-2019

त्यांनी मांडले होते, किंबहुना आधुनिक व व्यापक शेती असे सर्वकरण करणे आधुनिक शेती तंत्र ज्ञानाचा वापर करावा, तसेच पारंपरिक शेती संरक्षणाची साथ धरून या शेतीला व्यापक करावे तरच शेती आणि शेती व्यवसाय करणे शक्य आहे असे ते म्हणत.[८]

१.७ महाराष्ट्रातील शेतीच्या समस्या :

महाराष्ट्राच्या शेतीपुढे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.त्यात शेतीच्या औजाराची आणि बी-बियांणांची वाढती किंमत, जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी आणि शेतकऱ्यांना असलेला अल्प भाव आधुनिक शेतीच्या ज्ञानाचा अभाव ,पीक व्यवस्थापनाचा अभाव, वेळेवर योग्य साधन सामुग्री उपलब्ध न होणे, शेतीचे तुकडीकरण, पर्यायी भांडवल आणि निधी पुरवठ्याचा अभाव,इत्यादींमुळे आज महाराष्ट्रातील शेती संकटात आली आहे.महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा आर्थिक स्थितीत सुधारणा करायची असेल तर येथील शेती अधिक उत्पादक करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.पण शेतीक्षेत्रातील उत्पादकता चुटकीसरशी वाढवता येत नाही हे ही खरे. १५ वर्षापूर्वी मध्य प्रदेश राज्यातील शेती क्षेत्राची उत्पादकता महाराष्ट्राप्रमाणे तुलनात्मकरित्या होती.अशा वेळी तेथे नव्याने सत्तेवर आलेले मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी शेतीच्या कुंठीत अवस्थेमागील कारणांचा अचूक वेध घेतला आणि ते दूर करण्यासाठी प्रयत्न केले.सरकारच्या या धोरणामुळे त्या राज्यातील शेतीक्षेत्रातील उत्पादनवाढीचा दर १० वर्षे दोन अंकी राहिलेला आहे. त्यामुळे आज तेथील दर हेक्टरी उत्पादन सुमारे १,६५० किलो एवढे आहे.तर पंजाब व हरियाणा या राज्यांच्या विचार करता दर हेक्टरी उत्पादन केवळ ४० टक्के आहे. याचा अर्थ मध्य प्रदेश राज्यातील शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी अजूनही बरेच काही करता येण्यासारखे आहे.मध्य प्रदेश सरकारने शेती क्षेत्रातील उत्पादकता आणि उत्पादन यांच्या वाढीसाठी कोणती पावले उचलली आणि त्यांचा उत्पादकता वाढविण्याच्या संदर्भात काय लाभ झाला आहे,याचे सखोल विश्लेषण अशोक गुलाटी या ख्यातनाम कृषी अर्थतज्ज्ञाने केले आहे.पाणी ,बीज,आणि सडक या तीन महत्वाच्या बाबी शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने दमदार पावले उचलली. परिणामी तेथील शेती क्षेत्रात मोठे परिवर्तन झाले.चौहान यांच्या या कामगिरीवर गुलाटी एवढे खूश आहेत की,त्यांनी उत्तर प्रदेश राज्याची सूत्रे हाती घेतलेल्या योगी आदित्यनाथ यांना शिवमंत्र अनुसरण्याचा सल्ला कार्यक्षमिकृत प्रसारमाध्यमांतील आपल्या लेखाद्वारे दिला होता.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या चांगले दिवस यावेत असे राज्यकर्त्यांना वाटते.तर पाणी ,बीज आणि सडक या तीन सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज वाटते.शरद जोशींचे म्हणणे की, सिंचनाची सुविधा निर्माण केली आणि उत्पादनात वाढ झाली म्हणजे शेतमालाच्या किमती कोसळतात,मात्र मध्य प्रदेशात तसे झाले नाही.कारण धान्याच्या बाजारपेठेत शासनाने हस्तक्षेप केला. तसेच महाराष्ट्रात घडले म्हणून येथील शेतकऱ्यांच्या नेत्यांनी राज्य सरकारवर दबाव आणावला हवा.महाराष्ट्रातील शेती विकासासाठी अधिकाधिक शेती सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यास हवी.[९]

महाराष्ट्रात पाण्याची तीव्र टंचाई आहे.राज्यातील जवळपास ८६ टक्के भाग दुष्काळप्रवण आहे.[६] त्यामुळे शेतीला पर्याय म्हणून अनेक ठिकाणी दुधाच्या व्यवसायाचा विस्तार करणे योग्य ठरेल.त्यासाठी दर्जेदार चाऱ्याचा प्रश्न सोडविणे,दुभत्या गुरांसाठी सकस पशुखाद्य स्वस्तात उपलब्ध करणे, गुरांना चांगली पशुवैद्यकीय सुविधा मिळावी यासाठी प्रमुख केंद्राचा कर्मचारी योग्य व्यवस्था करणे आणि शेतकऱ्यांनी उत्पादन केलेल्या दुधाचे संकलन करण्याची कार्यक्षम यंत्रणा उभी करणे.या गोष्टी प्राधान्याने कराव्या लागतील. यातील दर्जेदार चाऱ्याची समस्या सोडविण्यासाठी गोड ज्वारीच्या वाणांची लागवड करणे फायदेशीर ठरेल.त्याच पध्दतीने गुरांची आणि शेवग्याची मोठ्या प्रमाणावर लागवड करुन व दुभत्या गुरांना असा आहाराचा पाल्याचा खुराक देऊन प्रथिनांचा पुरवठा सुधारता येईल.चांगली पशु वैद्यकीय सुविधा ही प्रशिक्षण व कार्यक्षम कर्मचारी यावर अवलंबून असते.प्रोत्साहनपर बोनस दिल्यास अशा सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी मदत होऊ शकेल.विदर्भ आणि मराठवाडा या विभागात दुधाचे संकलन करण्यासाठी राष्ट्रीय डेरी डेव्हलपमेंट बोर्डाची मदत


Govt. College of Arts & Science ★ Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science A'bad.
Scanned with OKEN Scanner

घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे, अशी बातमी नुकतीच वर्तमानपत्रात झळकली होती. म्हणजे दुग्ध व्यवसायाचा विकास करण्याचे काम या सरकारच्या कार्यक्रम पत्रिकेवर आहे असे दिसते. शेळ्या व मेंढ्यापालन, कुक्कुटपालन, रेशीमकिडे जोपासना, मधुमक्षिका पालन असे विविध व्यवसाय ग्रामीण भागात संघटित करता येतील. अशा रीतीने गावोगावच्या सीमांत अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या रिकाम्या हातांना उत्पादक रोजगार मिळवून देण्यासाठी शासनाने प्रयत्न करायला हवा. चीनमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीचे क्षेत्रफळ दिड एकर एवढे मर्यादित आहे. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या रिकाम्या हातांना काम मिळावे म्हणून टाऊन अँड व्हिलेज इंडस्ट्रीज संघटित करण्यात तेथील शासनाने पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्रात एक हेक्टर क्षेत्रावर एका हंगामात भुसार पीक घेणाऱ्या शेतकऱ्याला केवळ ४५० ते ५०० तास काम उपलब्ध होते. त्यामुळे अशा शेतकऱ्यांच्या रिकाम्या हातांना उत्पादक काम मिळवून देण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न सुरु करण्याची गरज आहे. तरी होईल तेव्हाच सीमांत अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होईल आणि सर्वसाधारण शेतकऱ्यांना बरे दिवस येतील.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील " यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल स्टडीजचे" समन्वयक एम.एस देशमुख यांनी बीबीसी मराठीशी बोलताना महाराष्ट्रातील शेती तोट्यात असण्याची काही महत्त्वाची कारणं सांगितली आहेत.[७]

- अपुरी सिंचन व्यवस्था:-देशातील सर्वाधिक धरणांची संख्या महाराष्ट्रात असली तरी महाराष्ट्रात सिंचनाखाली असलेल्या क्षेत्राचे प्रमाण फक्त १८ टक्के एवढेच आहे.
- महाराष्ट्रातील बराचसा भाग हा दुष्काळग्रस्त आहे.
- पीक पध्दतीत बदल करण्याची आवश्यकता आहे, कारण ज्या भागात पाणी नाही अशा भागातही साखर कारखाने सुरु झाले आहेत.
- २०१३-१४ मधल्या आकडेवारीनुसार शेतीसाठी उपलब्ध पाण्यापैकी ६० ते ६२ टक्के पाणी हे ऊस पिकासाठी लागतं. साहजिकच उरलेल्या पाण्यात इतर पिकांची उत्पादकता वाढणे शक्य नाही.
- शेतकऱ्यांनी घेतलेल्या शेती कर्जाचा पूर्ण विनियोग हा शेतीत गुंतवणूक म्हणून होत नाही, यातून शेतकऱ्याला योग्य तो परतावा मिळत नाही. परिणामी शेतकरी कर्जाच्या चक्रात अडकत जातात.
- शेतीचे तुकडीकरण वाढत चालले असल्याने लहान शेतकऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे यांत्रिकीकरण फायद्याचे होत नाही.
- किमान आधारभूत किंमतीचाही संरक्षण नाही.


**प्रमुख खरिप पिकांचे क्षेत्र व उत्पादन:**

| अ.क्र | पीक | २०१६-२०१७ | २०१७-२०१ ८ (अस्थाई) | शेकडा |
|---|---|---|---|---|
| १ | तांदूळ | १४६६ | १४४७ | (-) १ |
| २ | ज्वारी | ६०४ | ४१० | (-)३२ |
| ३ | बाजरी | ८३७ | ६८० | (-)१९ |
| ४ | नाचणी | ९३ | ८६ | (-)७ |
| ५ | मका | ६५८ | ९१४ | ३९ |
| ६ | इतर तृणधान्ये | ४४ | ४२ | (-)५ |
| | एकूण | ३७०२ | ३५७९ | (-)३ |

Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science, A'bad.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Govt. College of Arts & Science ★ Aurangabad
Scanned with OKEN Scanner




सध्या शेती जी तोट्यात आहे, त्याचं सर्वात मोठं कारण म्हणजे शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीचं संरक्षणही मिळत नसल्याचं ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ मिलिंद मुरुगकर यांनी सांगितलं.ते म्हणाले, कोरडवाहू शेतीमधली नगदी पीक म्हणजे डाळी होय.जगभरात डाळींच्या किमती पडलेल्या आहेत.अशा स्थितीमध्ये शेतकऱ्यांना किमान हमी भावाचं संरक्षण मिळणं आवश्यक आहे.प्रत्यक्षात तेही मिळताना दिसत नाही.स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी तर लांबच राहिल्या.

**स्वामीनाथन आयोगाच्या महत्त्वाच्या शिफारशी :**[८]

- भारतीय किसान सभेनं शेतकऱ्यांच्या वेगवेगळ्या मागण्यांसाठी काढलेल्या लॉंग मार्चची एक प्रमुख मागणी म्हणजे स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींची सरकारने अंमलबजावणी करावी.गेल्या वर्षी महाराष्ट्रात झालेला शेतकऱ्यांचा संप,मध्य प्रदेशात झालेली शेतकऱ्यांची निदर्शने अशा विविध आंदोलनांत स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा मुद्दा नेहमी पुढे आला आहे.नोव्हेंबर २००४ मध्ये एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली या नॅशनल कमिशन ऑन फार्मर्सची स्थापना करण्यात आली. २ वर्ष अभ्यास करून या आयोगानं अहवाल सादर केला आहे.या आयोगाच्या महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे.
- पिकांच्या उत्पादन खर्चापेक्षा ५० टक्के जादा भाव शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे.
- शेतकऱ्यांना उत्तम दर्जाची बियाणं कमी दरात मिळावीत.
- गावांत शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी व्हिलेज नॉलेज सेंटरची स्थापना व्हावी.
- महिला शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड दिलं जावं.
- शेतकऱ्यांसाठी कृषी जोखीम फंडाची स्थापना केली जावी.नैसर्गिक आपत्तींच्या काळात या मधून शेतकऱ्यांना मदत केली जावी.
- अतिरिक्त आणि वापरात नसलेल्या जमिनीचं वितरण शेतकऱ्यांना केलं जावं.
- शेतीयोग्य जमीन आणि वनजमिनी शेती सोडून इतर वापरांसाठी कॉर्पोरेट कंपन्यांना देऊ नयेत.
- कृषी विमा योजना सुविधा संपूर्ण देशभर सर्व पिकांसाठी लागू करावी.
- शेती कर्जाची सुविधा सर्व गरीब आणि गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे.सरकारच्या मदतीनं शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या कर्जाचा व्याजदर ४ टक्के केला जावा.
- नैसर्गिक संकटांवेळी कर्ज वसुलीसाठी सवलत दिली जावी.नैसर्गिक संकटग्रस्त भागांत व्याजदरात सवलत दिली जावी.नैसर्गिक संकटाची स्थिती असेपर्यंत ही सवलत कायम ठेवली पाहिजे.

२८ टक्के भारतीय कुटुंब दारिद्र्य रेषेखाली आहेत.अशा लोकांच्या अन्नसुरक्षेची शिफारस आयोगानं केली आहे.

Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science, Aurangabad



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 183 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

**१.८ निष्कर्ष :**

महाराष्ट्रातील शेती सातत्यानं तोट्यातच असल्याचं राज्य सरकारच्या आर्थिक पाहणी अहवालातून स्पष्ट होतं.विशेष म्हणजे २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात पिकांतील मूल्यवृध्दी उणे १४.४ टक्के इतकी म्हणजेच नकारात्मक राहिलेली आहे.ही रक्कम पैशांत मोजली तर ती काही हजार कोटींमध्ये जाते.तर गेल्या ६ वर्षात शेती ४ वेळा तोट्यात राहिली असल्याचं या अहवालातून दिसतं.काही दिवसांपूर्वी मराठवाड्यातल्या आणि कोल्हापुरातल्या शेतकऱ्यांनी गारा पडल्या म्हणून स्वतःच्या शेतातल्या कोबीच्या पिकांची नासधूस करतानाचे व्हीडीओ व्हायरल झाले होते.मागे विधान भवनावर शेतकऱ्यांनी काढलेल्या मोर्चाला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता.त्या आधी गेल्या वर्षी राज्यातल्या शेतकऱ्यांनी संपाचं अस्त्र उगारलं होतं.तूर, सोयाबीन, कांदा, टोमॅटो यांचे भाव पडल्यानंतर शेतकऱ्यांनी वेळोवेळी तीव्र आंदोलनं केली आहेत.राज्यातल्या शेतीची स्थिती विदारक होत चालल्याचं हे चित्र आहे का, राज्यातील शेती आणि शेतकरी खरोखर तोट्यात आहेत का, असे प्रश्न या निमित्तानं उपस्थित होतात.[७]

**१.९ शिफारशी /उपाययोजना :**

१. भविष्यकाळात शेती करताना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करुन पारंपरिक शेती तंत्रज्ञानाची साथ घेणे गरजेचे आहे.
२. उद्याच्या शेतीचा विचार करतांना पारंपरिक आणि आधुनिक शेतीमध्ये सामंजस्य स्थापित करित असतांना जे प्रश्न उभे राहतील त्यावर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.
३. देशातील इतर राज्यात फळबाग किंवा इतर पिकांसंदर्भात दर्जेदार उत्पादन झाले आहे व त्यासंदर्भात अनेक नावीण्यपूर्ण संशोधन झाले आहे.तेव्हा महाराष्ट्रातील कृषी विभागाने याचा अभ्यास करुन तसे प्रयोग महाराष्ट्रात करावे.

RESEARCH JOURNEY

**-संदर्भग्रंथ सुची :**

१. महेश शिरापूरकर - शेतकऱ्याच्या आत्महत्या विविध अभ्यासगटांचे अहवाल, महाराष्ट्र वार्षिकी, २०१०, पृ.क्र. ८९.
२. शेख फारुख नजीर - आर्थिक विकास एक चिंतन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जानेवारी २०१३, पृ.क्र. १६४.
३. दैनिक प्रहार, दिनांक - १४ नोव्हेंबर २०१६.
४. उपरोक्त.
५. रमेश पाध्ये - महाराष्ट्रातील शेती : समस्या आणि उपाय, २०१७.
६. उपरोक्त.
७. डॉ. एम.एस. देशमुख,महाराष्ट्रातील शेती तोट्यात असण्याची कारणे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल स्टडीज, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१७.

Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science A'bad.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner